**नियमीत फौजदारी खटला क.७५६/१३**
**सरकार -वि-शांता व इतर**
**निशानी कमांक ३०**

**सरकारतर्फे साक्षीदार कमांक १ चे बयान**

**मी शपथपुर्वक खरे सांगतो की :-**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :- | राजेंद्र वामनराव कुंभारे |
| वय | :- | ६१ वर्षे, |
| व्यवसाय | :- | सेवानिवृत्त |
| राहणार | :- | फ्रेंन्डस कॉलनी काटोल रोड, नागपूर |

**सरतपास अभियोगपक्षातर्फे श्री.व्हि.यु मिरचे**

१. मी वन विभागात वन मजुर या पदावर कार्यरत होतो. मी ४.३.२०१९ रोजी सेवानिवृत्त झालो. दि.७.१०.२०१२ रोजी सहायक वन संरक्षक ए.जी.अंजीकर आणि वन परिक्षेत्र अधिकारी डि.आर.नंदनवार यांनी मला वन विभागाचे सेमिनरी हिल नागपूर येथील नर्सरीला पंच साक्षीदार म्हणून मला बोलवले होते. त्यांनी सांगितले की हरणाचे व काळवीटचे शिंगे जप्त करायचे आहे. त्यांनी मला दोन शिंगे काळवीटचे आणि दोन शिंगे हरणाचे दाखविले आणि माझया समक्ष जप्ती पंचनामा तयार केला. त्यावेळी मौका पंचनामा देखील तयार करण्यात आला होता. सदर मौका पंचनामा मला आता दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच साक्षीदार म्हणून सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशानी कमांक ३१** देण्यात येत आहे. जप्ती पंचनामा तयार करण्यात आला होता. सदर जप्ती पंचनामा मला आता दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच साक्षीदार म्हणून सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशानी कमांक ३२** देण्यात येत आहे.

त्यानंतर जप्त शिंगे वनक्षेत्र साहायक यांना देण्यात आले. त्याबाबत सुप्रतनामा तयार करण्यात आला. सुप्रतनामा मला आता दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशानी कमांक ३३** देण्यात येत आहे. तसेच माझे बयाण देखील नोंदविण्यात आले होते.

**उलटतपास आरोपी तर्फे श्री.एल.बी.खेरगडे वकील**:-

मौका पंचनामा वन विभागाचे सेमिनरी हिल नागपूर येथील नर्सरीला तयार करण्यात आले होते हे म्हणणे खरे आहे. माझया समक्ष जप्त शिंगांना सिल लावण्यात आले नव्हते हे म्हणणे खरे आहे. जप्ती पंचनामा नि.क्र.३२ आणि नि.क्र.३३ च्या तारखांमध्ये

खाडाखोड आहे हे म्हणणे खरे आहे. वन अधिकारी गरज भासल्यास मला पंच साक्षीदार म्हणून हजर राहण्यास सांगत असतात  हे म्हणणे खरे आहे. पंच साक्षीदार म्हणून हजर राहण्यासाठी मला लेखी सुचना देण्यात आली नाही. वन संरक्षक ए.जी.अंजीकर आणि वन परिक्षेत्र अधिकारी डि.आर.नंदनवार यांनी मला शिंगे जप्त केले आहेत असे सांगितले व त्यांनी मला पंच साक्षीदार म्हणून सही करण्यास सांगितल्याने मी सहया केल्या हे म्हणणे खरे आहे. शिंगे माझे समक्ष जप्त करण्यात आले नाही व माझया समक्ष केवळ पंचनामा तयार करण्यात आला  हे म्हणणे खरे आहे.  माझया समक्ष कोणतेही पंचनामे तयार झाले नाही  हे म्हणणे खरे नाही. मी खोटया पंचनाम्यावर सहया केल्या हे म्हणणे खरे नाही. जप्त शिंगे वनक्षेत्र सहायक एम.डी.मोहीते यांना सुप्रतनाम्यावर देण्यात आले नाही हे म्हणणे खरे नाही. मौका पंचनामा, जप्ती पंचनामा आणि सुप्रतनाम्यातील मजकुर मला माहित नाही हे म्हणणे खरे आहे.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती

(सि.आर.बलवानी)

दिनांक :  १३.१२.२०१९

अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर